आर.सी.सी. ८९/२०२१
सरकार वि. मुरलीधर गोडे
**निशाणी २१**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – रामभाऊ देवराम गोडे, वय – ७७ वर्षे,
व्यवसाय – शेती, राहणार – केळी कोतुळ–गोडेवाडी,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. दिनांक २३.०१.२०२१ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी केळी कोतुळ–गोडेवाडी येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. मला नंदा तुकाराम गोडे यांच्या घराजवळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. घटनास्थळ हे मला साळवे पोलीस व नंदा तुकाराम गोडे यांनी दाखवले. घटनास्थळाच्या पुर्वेस विजय गोडे याचे घर आहे, पश्चिमेस नामदेव गोडे याचे घर आहे, उत्तरेस नंदा तुकाराम गोडे यांची शेती आहे, दक्षिणेला नंदा तुकाराम गोडे यांचे घर व शेती आहे. त्या ठिकाणी पोलीसांनी माझे समक्ष दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा केला. आता मला अभिलेखावरील सदरचा घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २२** देण्यात येते. पंचनाम्यासाठी माझे सोबत दुसरा पंच लक्ष्मण वायळ हा होता. पंचनामा हा सकाळी १०:३० वाजता चालू केला व ११:०० वाजता संपला.

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. के. बी. हांडे यांच्या मार्फत –**

२. मी नंदा गोडे यांचा नात्याने चुलत सासरा आहे. माझे घर व घटनास्थळ जवळ–जवळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, नंदाने मला बोलावले म्हणून मी तेथे गेलो होतो. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, त्यास नंदा व पोलीसांनी बोलावले होते.

आर.सी.सी. ८९/२०२१
सरकार वि. मुरलीधर गोडे
**निशाणी २१**

**प्रश्न –** घटनास्थळाचा घर नंबर, सर्व्हे नंबर तुम्हाला सांगता येणार नाही ?

**उत्तर –** घराला घर नंबर नाही. तेथे केवळ छप्पर होते.

जेथे छप्पर होते त्या जागेचा जुना सर्व्हे नंबर १६१ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या जागेचा नवीन सर्व्हे नंबर मला सांगता येणार नाही. घटनास्थळाच्या चतु:सिमेतील घरांचे घर नंबर मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा लिहीला व मी त्यावर केवळ सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याला गेलोही नाही केवळ त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, नंदाच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.11.12 17:32:11 +0530

दिनांक १२.११.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले